महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २४ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## पालघर पालिका निवडणुकीसाठी ५६ केंद्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर नगर परिषदेमध्ये एकूण १५ प्रभाग असून ३० नगरसेवकपदासाठी ही निवडणूक होणार आहे. १५ प्रभागांमध्ये ११५ नगरसेवकपदासाठी ११५ उमेदवार रिंगणात आहेत. तर नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत ६ उमेदवार आहेत. १५ निवडणूक प्रभागांसाठी ५६ मतदान केंद्रे असणार आहेत. याअंतर्गत ७१ कंट्रोल युनिट, १४० बॅलेट युनिट आणि ७१ मेमरी यंत्र असणार आहेत.

२५ तारखेपर्यंत माघारीची मुदत आहे. यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. पालघर नगर परिषदेसाठी उपविभागीय अधिकारी शाम मदनूरकर हे निवडणूक निर्णय अधिकारी तर मुख्याधिकारी प्रशांत जाधव हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. तर तहसीलदार रमेश शेंडगे हे अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहेत.

## तीन हात नाक्यावरील वाहतूक कोंडी फुटणार!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील तीन हात नाका, नितीन जंक्शन, कॅडबरी जंक्शन आणि माजीवाड्यातील गोल्डन डायज जंक्शन येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएने आनंदनगर ते साकेतदरम्यान ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरून 8.24 किमी लांबीचा उन्नत मार्ग उभारण्याचे काम हाती घेत आहे, ज्यामुळे ठाण्यातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. सध्या ठाण्यातील ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील तीन हात नाका, नितीन जंक्शन, कॅडबरी जंक्शन आणि माजीवाड्यातील गोल्डन डायज जंक्शन येथे कायमस्वरूपी वाहतूक कोंडी होत असते. प्रतीक्षाकाळ वाढण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे तीन हात नाका, कॅडबरी जंक्शन आणि माजीवाडा येथे सहा-लेनचे उड्डाणपूल असले तरी, तिथे ये-जा करणारी वाहतूक आणि विविध सर्व्हिस रोड्स व स्लिप रोड मुख्य रस्त्यात मिसळतात. ठाण्यातील तीन हात नाका, नितीन जंक्शन, कॅडबरी जंक्शन आणि माजीवाड्यातील गोल्डन डायज जंक्शन येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएने आनंदनगर ते साकेतदरम्यान ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरून 8.24 किमी लांबीचा उन्नत मार्ग उभारण्याचे काम हाती घेत आहे, ज्यामुळे ठाण्यातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

## उल्हासनगरातील सर्व शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ अनिवार्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगरातील सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये आता माजी विद्यार्थी संघ स्थापन करणे अनिवार्य ठरणार आहे. राज्य शासनाच्या नव्या आदेशानुसार शाळेच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचा सहभाग अधिक मजबूत करण्यासाठी आणि शैक्षणिक तसेच भौतिक विकासाला नवी दिशा देण्यासाठी उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाने सर्व शाळांना तातडीने संघ स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. शाळेच्या घडणीमुळे मोठ्या पदांवर आणि विविध क्षेत्रांत झळकणारे असंख्य माजी विद्यार्थी आता पुन्हा आपल्या शाळेशी अधिक दृढ नात्याने जोडले जाणार आहेत. उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत शहरातील सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे आदेश जारी केले आहेत. या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाने सर्व शाळांना इयत्ता १ ते १२ या एकत्रित स्तरावर माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून माजी विद्यार्थी संघ स्थापन करावा आणि त्याचा अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करावा असे निर्देश दिले आहेत.

**ज्या शाळांनी आधीच माजी विद्यार्थी संघ स्थापन केला आहे, त्यांनी त्याची सविस्तर माहिती स्वतंत्र लिंकवर तातडीने भरावी. ज्यांनी अद्याप संघ स्थापन केला नाही, त्यांनी तातडीने संघ स्थापन करून कार्यवाही सुरू करावी. या निर्णयामुळे उल्हासनगरातील हजारो माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेशी पुन्हा एकत्र येण्याची आणि शाळेच्या उभारणीत थेट योगदान देण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. शाळा-माजी विद्यार्थी संबंधांचा नवा अध्याय आता सुरू होणार आहे.**

**■ दीपक धनगर,**
**प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग**

# पोलिसांनी कुठल्याही कारवाईमध्ये कसूर करू नये

## - गौरी गर्जे आत्महत्या प्रकरणी पंकजा मुंडे यांच्या सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नीने आत्महत्या केली. त्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. डॉ. गौरी पालवे-गर्जे हा अनंत गर्जे यांच्या पत्नी होत्या. वरळीतल्या राहत्या घरी त्यांनी गळफास घेतला. त्याच अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला होता. पत्नीने आत्महत्या केल्यानंतर अनंत गर्जे यांनी पहिला फोन मंत्री पंकजा मुंडे यांना केला होता. पंकजा यांनी ही याला दुजोरा दिला आहे. शिवाय त्यावेळी नक्की काय बोलणे झाले याची माहिती ही पंकजा मुंडे यांनी दिली आहे. या आत्महत्येमुळे राज्यात खळबळ उडाली आहे. शिवाय पंकजा यांचे पीए असलेल्या अनंत यांच्यावर गंभीर आरोप ही करण्यात आले आहे.

पंकजा मुंडे यांनी याबाबत आपली प्रतिक्रीया दिली आहे. 22 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडेसहा ते पावणे सातच्या दरम्यान पीए अनंत याचा फोन आला होता असं पंकजा यांनी सांगितलं. हा फोन माझ्या दुसऱ्या पीएच्या फोनवर आला होता. त्यावेळी दुसऱ्या बाजूने अनंत खूप रडत होता. पत्नीने आत्महत्या केल्याचे त्याने अत्यंत आक्रोशाने सांगितले. शिवाय तो असं ही म्हणाला की





पत्नीने आत्महत्या करणे ही गोष्ट माझ्यासाठी खूप धक्कादायक होती. त्याने आत्महत्येची माहिती देताच आपल्याला ही धक्का बसला असं ही पंकजा यांनी यावेळी सांगितलं.

पोलिसांनी कुठल्याही कारवाईमध्येकसूर राहू नये. त्यांनी योग्य तपास करुन या विषयाला हाताळावे असे माझे म्हणणे आहे. तसे मी पोलिसांना देखील सांगितले आहे. योग्य दिशेने या आत्महत्येचा तपास केला जावा असं ही त्यांनी पोलीसांना सांगितल्याचं पंकजा म्हणाल्या. दरम्यान आपण अनंतची पत्नी म्हणजेच डॉक्टर गौरीच्या वडीलांशीही बोलली असल्याचं त्यांनी सांगितले. ते प्रचंड दुःखात आहेत, त्यांची स्थिती मी समजु शकते असं ही पंकजा यावेळी म्हणाल्या. आपण त्यांनी धीर दिल्याचं ही त्यांनी सांगितलं. काळजी करून नका योग्य तपास होईल असं ही त्यांना सांगितल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

अश्या घटना जीवाला चटका लावून जातात. मनाला सुन्न करतात. कोणाच्या वैयक्तिक जीवनात काय चालू असतं हे अनाकलनीय आहे. अचानक धक्कादायक अशी ही घटना घडली असल्याने मलाही अस्वस्थ वाटत आहे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. डॉक्टर गौरी पालवे-गर्जे या केईएम हॉस्पिटलमधील दंत चिकित्सा विभागामध्ये कार्यरत होत्या. गौरी आणि अनंत यांचे 7 फेब्रुवारी 2025 रोजी लग्न बीड जिल्ह्यात झालं होतं. या लग्न सोहळयामध्ये मंत्री पंकजा मुंडे आणि प्रीतम मुंडे यांसह मोठमोठ्या लोकांनी उपस्थिती दर्शवली होती. त्यांच्या लग्नाला सात महिनेच झाले होते. त्यानंतर ही घटना घडलीय

# जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणार?

## अजित पवारांनी दिले संकेत, राजकीय वर्तुळात खळबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान २ डिसेंबर रोजी होणार आहे. ३ डिसेंबर रोजी निकाल लागणार आहे. दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. पण या निवडणुका लांबणीवर जाणार असल्याचे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. जिल्हा परिषदेतील आरक्षणाबाबत कोर्टात सुरू असलेल्या प्रकरणाने निवडणूक लांबण्याची शक्यता अजित पवार यांनी व्यक्त केली. ते नळदुर्गमध्ये प्रचारसभेत बोलत होते.**



महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ओलांडल्यामुळे निवडणुका लांबणीवर पडू शकतात. यावर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. २५ तारखेला सुप्रीम कोर्ट काय निर्णय देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. याबाबत अजित पवार यांनी आपले मत व्यक्त केलेय. कोर्टात सुरू असलेल्या प्रकरणामुळे निवडणूक लांबणीवर जाऊ शकते असं अजित पवार म्हणाले. नगरपरिषद आणि जिल्हा परिषद निवडणूक विविध कारणामुळे लांबणीवर पडली. जिल्हा परिषद निवडणूक कधी होणार यासाठी अनेक इच्छुक वेटिंगवर आहेत. मात्र पुन्हा एकदा निवडणूक लांबण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निवडणुका घ्यायचा अधिकार पूर्णपणे आयोगाचा असल्याचे पवार म्हणाले. सध्या नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निकालानंतर राज्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज होता. पण आरक्षणाच्या मुद्द्याचे प्रकरण कोर्टात गेल्यामुळे कायदेशीर अडचणींमुळे निवडणुका लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मतदार यादीतून चक्क माजी उपमहापौरांचेच नाव गायब?

### कल्याण-डोंबिवलीत राजकीय डावपेचांना ऊत - भाजपच्या बुधराम सरनोबत यांचा गंभीर आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा, ता. २३ (वार्ताहर):** कल्याण-डोंबिवली महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये मोठा घोळ झाल्याचे उघड झाले आहे. तब्बल तीन टर्म नगरसेवक राहिलेल्या आणि माजी उपमहापौर असलेल्या बुधराम सरनोबत यांचेच नाव यादीतून वगळण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यापूर्वी ठाणे महापालिकेच्या यादीतून माजी नगरसेवक सुधीर भगत यांचे नाव वगळल्याची घटना ताजी असतानाच आता टिटवाळा येथील प्रभागातील प्रबळ दावेदार असलेले सरनोबत यांचे नाव वगळले गेल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. यामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप सरनोबत यांनी केला आहे.

सरनोबत हे 'अ' प्रभाग क्षेत्रात येणाऱ्या पॅनेल क्रमांक ३ मधील अनुसूचित जमाती 'ब' जागेसाठी प्रबळ दावेदार आहेत. यंदा ही जागा महिला आरक्षणाखाली आल्याने त्यांची पत्नी अंजना सरनोबत या भाजपकडून निवडणुकीत उभ्या राहणार असल्याचे बोलले जात आहे. नेमके याच प्रभागातील मतदार यादीतून बुधराम सरनोबत यांचे नाव अचानक गायब झाल्याने राजकीय संशय अधिक गडद झाला आहे.

राजकीय दबावाखाली मुद्दाम माझे नाव काढले गेले आहे. मतदार यादीतून नाव वगळून कोणाचे राजकीय गणित साधले जात आहे, हे लवकरच उघड होईल, असा आरोप सरनोबत यांनी केला आहे.

# लालपरीची शालेय विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाइन !

## विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानाला यापुढे आगार व्यवस्थापक जबाबदार - परिवहन मंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** एसटी बसमधून शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे. एसटी प्रवासात काही अडचण आल्यास, एसटी बसेस वेळेवर न आल्यास अथवा अचानक रद्द झाल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी लवकरच एसटी महामंडळ हेल्पलाइन सुरू करणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीला आगार व्यवस्थापक जबाबदार असणार आहेत.

राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून मानव विकास निधी अंतर्गत राजाच्या दुर्गम व आदिवासीबहुल भागामध्ये शालेय विद्यार्थिनींना प्रवासी सेवा देण्यासाठी मानव विकास बस उपलब्ध करून दिलेल्या आहेत. बस शालेय विद्यार्थिनींची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात याव्यात, अशा सूचना असतात. परंतु अनेक आगारात या नियमाची पायमल्ली होते. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली. यावेळी उपस्थित शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींनी याबाबत अनेक समस्या व तक्रारी मंत्र्यांकडे मांडल्या. अनेक शालेय बस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळी शाळा-महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले घरी जाणे अपेक्षित असते. मात्र बस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास उशीर होतो. अनेक ठिकाणी गैरसमजातून पालकांनी विद्यार्थ्यांना उशिरा येण्याबद्दल शिक्षाही दिल्या आहेत. याबाबत स्थानिक एसटी प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले.

शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना घरातून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाडामुळे बस नादुरुस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी एसटीच्या हेल्पलाइन क्रमांकवर संपर्क करून मदत घ्यावी, या - हेतूने एक हेल्पलाइन क्रमांक प्रदर्शित करण्यात येईल. ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येतील जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये महाविद्यालयाचे शाळा प्राचार्य, मुख्याध्यापक, थेट विद्यार्थी विद्यार्थ्यांनीदेखील विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.







# भिवंडी शहरात भटक्या श्वानांवर विषप्रयोग ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी येथील एका गृहसंकुलाच्या आवारात तीन भटक्या श्वानांचे मृतदेह आढळून आले आहेत. या भटक्या श्वानावर विषप्रयोग करण्यात आला असावा असा संशय व्यक्त होत आहे. असून तक्रारदार हे प्राणीप्रेमी असून ते मुंबई, ठाणे शहरातील भटक्या श्वानांची नसबंदी करणे, भटक्या जखमी श्वानांवर उपचार करणे तसेच श्वानांना दत्तक देण्याचे काम करतात. भिवंडी येथील साईबाबा मंदिराजवळील एका गृहसंकुलात २० नोव्हेंबरला दोन भटके श्वान मृत अवस्थेत आढळून आल्याची तक्रार त्यांना गृहसंकुलातील एका महिलेने दिली. त्यानंतर तक्रारदार हे घटनास्थळी पोहचले असता, त्यांनी गृहसंकुलातील कामगारांना विचारले. त्यावेळी या श्वानांवर विषप्रयोग झाला असवा असा संशय त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर त्यांना गृहसंकुलाच्या मागील परिसरातील एका नाल्याजवळ आणखी एका भटक्या श्वानाचा मृतदेह आढळून आला.

तक्रारदार यांनी तात्काळ याबाबतची माहिती शांतीनगर पोलिसांना दिली. त्यांनी तिन्ही भटक्या श्वानांचे मृतदेह रिक्षाने भिवंडी येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात विच्छेदन अहवालासाठी नेले. तसेच इतर भटक्या श्वानांवर विषप्रयोग झाला आहे का, याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी आणखी एका श्वानाची प्रकृती बिघडल्याचे आढळून आले. त्यांनी त्या श्वानाला उपचारासाठी पशुवैद्यकीय रुग्णालयात नेले. श्वानाची प्रकृती सध्या स्थिर आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११ (१) (ब) आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम (बीएनएस) ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## वाचक मनोगत

# नागरिकांच्या बेफिकिरीने भ्रष्टाचार बळावतोय?

भारतातील भ्रष्टाचाराबाबत “जवाबदार कोण?” या प्रश्नाला नेहमी दोन उत्तरे असतात. प्रशासन सांगते, “लोकप्रतिनिधी आम्हाला भ्रष्टाचार करण्यास भाग पाडतात.” तर लोकप्रतिनिधी म्हणतात, “आम्ही तर पाच वर्षांसाठी, कायमचे तर अधिकारीच असतात आणि त्यांनाच भ्रष्टाचार प्राणप्रिय असल्याने व्यवस्था भ्रष्ट झालेली आहे . अशा प्रकारे जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याचा हा खेळ व संभ्रम निर्माण करण्याचा खेळ दशकानुदशके सुरू आहे. महाराष्ट्रातील बहुतांश महानगरपालिकांमध्ये नगरसेवक नाहीत. प्रशासनावर नियंत्रण असणारी स्थायी समिती नाही . पंचायत समिती ,जिल्हा परिषदांमध्ये लोकनियुक्त लोकप्रतिनिधी नाहीत . सर्वत्र प्रशासकीय राजवट कार्यरत आहे.

गेल्या पाच वर्षातील प्रशासकीय राजवटीने प्रशासनाचे पितळ उघडे पडले आहे . भ्रष्टाचाराच्या खेळातील राजकारण्यांच्या खंदा प्रणेता व साथीदार कोण हे प्रशासकीय राजवटीने सुस्पष्ट केलेले आहे. एकाला झाकावे तर दुसरा उघडा पडतो अशी अवस्था दिसून येते. भ्रष्ट व्यवस्थेचे कपडे परिधान न करणाऱ्या अधिकाऱ्यांना "साईड पोस्टिंगला" टाकून , सातत्याने बदल्या करून नामोहरण केले जाते निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा "अधिकृत" हस्तक्षेप शून्य असल्याने नोकरशाहीला मुक्त अधिकार असण्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा नागरिकांच्या मनात निर्माण झाली होती. पण वास्तव पूर्णपणे उलटे निघाले. पंचायत समिती सदस्य , जिल्हा परिषद सदस्य , नगरसेवक नसतानाही, किंवा कदाचित त्यांच्या अनुपस्थितीतच, भ्रष्टाचार अधिक वाढल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागले. यामुळे हे निर्विवादपणे स्पष्ट झाले आहे प्रशासनालाही भ्रष्टाचार प्राणप्रिय आहे . भ्रष्टाचार हा नोकरशाहीचा श्वास आहे आणि ते त्याशिवाय राहू शकत नाही .

■ **लोकप्रतिनिधींकडून भ्रष्टाचारमुक्त कारभाराची अपेक्षा करणे म्हणजे स्वप्नरंजनः**

आज निवडणुकीतील खुलेआम पैसेवाटप, अब्जावधी खर्च, “मला काही मिळाले तरच मी मतदान करेन” अशी मतदारांची सार्वजनिक मानसिकता पाहता भ्रष्टाचारमुक्त कारभाराची अपेक्षा करणे म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात राहणे. नगरसेवक होण्यासाठी ५/१५ कोटींचा खर्च करणारा व्यक्ती निवडल्यानंतर तिजोरी लुटणार नाही तर करणार काय? मतदार आजही निद्रिस्त आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींनाच पुन्हा-पुन्हा निवडून देऊन लोकशाहीच्या गळा घोटण्याचे दुष्कर्म मतदारच करतात . हे वास्तव अस्वस्थ करणारे असले तरी अमान्य करता येणार नाही. मतदार आजही निद्रिस्त आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींनाच पुन्हा-पुन्हा निवडून देऊन लोकशाहीच्या गळा घोटण्याचे दुष्कर्म मतदारच करतात . हे वास्तव स्वस्थ करणारे असले तरी अमान्य करता येणार नाही.

**सुधीर लक्ष्मीकांत दाणी**
सजग नागरिक मंच नवी मुंबई

# स्वत:ची किंमत 20 पैसे करु नका; माणुसकी जपणाऱ्या व्यक्तीलाच मत द्या - आमदार जितेंद्र आव्हाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंबानी आणि आपल्या मताचे मूल्य समान केले आहे. त्यामुळे आपले बहुमूल्य मत विकू नका. आज तुम्हाला ते १ हजार रूपये देतील. पण, पाच वर्षांचे गणित बांधल्यास दिवसाला वीस पैसे इतकी किमंत आपल्या मताची ठरत आहे. त्यामुळे स्वतःची किमंत २० पैसे करू नका. माणुसकी जपणाऱ्या व्यक्तीलाच मत द्या, असे वक्तव्य आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात बोलताना केले.

कळवा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम साळवे आणि त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांनी शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड आणि जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. यावेळी फुले नगर, जयभीम नगर, सायबा नगर, जानकी नगर आदी परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

साळवे यांचा पक्षप्रवेश झाल्यानंतर आव्हाड यांनी नागरिकांना आवाहन केले की, '२० पैशात मते विकू नका माणुसकी जपणाऱ्या व्यक्तीलाच मत द्या. पुढे ते म्हणाले, मर्फी कंपनी जवळील हायवे लगत असलेल्या झोपडपट्टीला १९९३ साली आग लागली होती. या आगीत २१ जण मृत्युमुखी पडले होते. तत्कालीन नगरसेवक आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी प्रयत्न करून तेथील नागरिकांचे कळव्यात पुनःर्वसन केले होते.

परंतु, गेल्या काही वर्षांत येथे दादागिरी वाढली आहे, काही लोक अंमली पदार्थांचा व्यापार करीत आहेत. इथले काही जण कधी शुद्धीतच नसतात. म्हणूनच आपल्याला शुद्धीत असलेले आणि इथल्या माणसाला माणुसकीने वागवणाऱ्या व्यक्तीला आपले प्रतिनिधी करायचे आहे, असे आवाहन आव्हाड यांनी केले.

# आटगाव : वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात

## दोघांचा मृत्यू ; एक जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : मुंबई नाशिक महामार्गावरील आटगाव भागात हळदीच्या समारंभातून घरी परतत असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दोघांचा मृत्यू तर एकजण जखमी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मयुरेश चौधरी (२७), जयेश शेंडे (२५) अशी मृतांची नावे असून या घटनेमुळे शहापूरात शोककळा पसरली आहे. शहापूर येथील मयुरेश चौधरी, जयेश शेंडे आणि हर्षल जाधव हे तिघे तरुण पेंढरघोळ येथे हळदी समारंभासाठी गेले होते. रविवारी ते मोटारीने पेंढरघोळ येथून नाशिक-मुंबई महामार्गावरून शहापूरच्या दिशेने निघाले होते. ते आटगाव जवळील संघवी कॉम्प्लेक्स परिसरात आले असता, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्यांची मोटार येथील एका कठड्याला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की मोटारीचा अक्षरशः चुराडा झाला.

# मानपाडा उड्डाणपूलावर वाहनाच्या धडकेत २५ वर्षीय मुलाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : घोडबंदर येथील मानपाडा उड्डाणपूलावर शनिवारी वाहनाच्या धडकेत २५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ऐनिश अँपलो लासराडो असे मृत तरुणाचे नाव असून या अपघाताप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गेल्याकाही वर्षांमध्ये घोडबंदर मार्ग हा अपघाताचा मार्ग ठरत आहे. अवजड वाहनांची बेदरकार वाहतुक यामुळे अनेक वाहन चालकांचा अपघाती मृत्यू झाला आहे. तरुण-तरुणींचाही अपघातात मृत्यू होऊ लागल्याने येथील रहिवाशांमध्ये भिती निर्माण होऊ लागली आहे.

# कल्याण : महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे नमाज पठण ?

## माफी मागितल्यानंतर प्रकारावर पडदा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणमधील एका महाविद्यालयातील संकुलात काही विद्यार्थ्यांनी नमाज पठण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर खळबळ उडाली. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर हिंदू संघटनांनी महाविद्यालयात धडक देत सदर प्रकरण उचलून धरले. या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत प्रकरण शांत केले. ज्या विद्यार्थ्यांवर नमाज पटण करण्याचा आरोप करण्यात आला होता. त्यांनी माफी मागितल्यानंतर या प्रकारावर पडदा पडला.

प्राथमिक माहितीनुसार, कल्याणमधील एका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संकुलात नमाज पठण केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकाराचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला. या विद्यार्थ्यांनी संकुलात नमाज अदा केली होती, असा दावा व्हायरल पोस्टमध्ये करण्यात आला होता.

व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते महाविद्यालयात पोहोचले आणि त्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला. हिल लाइन पोलीस ठाण्याला या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी तात्काळ पोहोचले. त्यांनी मध्यस्थी करत प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

पोलीस अधिकाऱ्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, सदर विषय महाविद्यालयाच्या संकुलात घडल्यामुळे महाविद्यालय प्रशासनाने यावर तोडगा काढावा, असे सुचविले गेले. महाविद्यालय प्रशासनानेही विद्यार्थ्यांना जाब विचारून सदर कृत्यामागचे कारण जाणून घेतले. यानंतर विद्यार्थ्यांनी नमाज पठण केल्याचे कबूल करत महाविद्यालय प्रशासनाची माफी मागितली.

# नांदिवली स्मशानभुमी नागरिकांसाठी खुली करा - भाजपाची मागणी

**भाजपा कल्याण ग्रामीण मंडळ चिटणीस संदीप क्षीरसागर यांचे केडीएमसी आयुक्तांना पत्र**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील नांदिवली येथील सार्वजनिक स्मशानभूमी बांधून तयार आहे मात्र काही सुविधा अपूर्ण असल्याने हि स्मशानभूमी नागरिकांच्या वापरासाठी अद्याप सुरु होऊ शकली नाही. त्यामुळे नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी विठ्ठलवाडी स्मशानभूमीत जावे लागत असल्याने नांदिवली येथील बांधून पूर्ण असलेल्या स्मशानभूमीत आवश्यक त्या सुविधा पूर्ण करून नागरिकांसाठी सुरु करण्याची मागणी भाजपाने केली आहे. याबाबत भारतीय जनता पार्टीचे कल्याण ग्रामीण मंडळ चिटणीस संदीप क्षीरसागर यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.

कल्याण पूर्वेतील मलंगगड रस्ता परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून वाढत्या लोकसंख्येसाठी या परिसरात एकही स्मशानभूमी नाही. नागरिकांची ही समस्या लक्षात घेऊन आई एकविरा महिला मंडळ संस्थापक अध्यक्षा सोनी क्षीरसागर व संदिप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याने २०२३ रोजी श्री मलंगगड रोड, नांदिवली तलाव येथे सार्वजनिक स्मशानभुमी बांधण्यात आली आहे. या सार्वजनिक स्मशानभुमीला कंपाउंड, लाकडे ठेवण्यासाठी रूम तसेच नागरिकांना बसण्यासाठी बॅन्चेसची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे स्मशानभुमी पूर्ण तयार असूनही नागरिकांना त्यांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे या सार्वजनिक स्मशानभुमीची राहिलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करून ही सार्वजनिक स्मशानभुमी नागरिकांकरिता खुली करण्याची मागणी क्षीरसागर यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

# अल्पवयीन मुलीचा विवाह !

## गागोदेवाडी येथील धक्कादायक प्रकार नातेवाईकांवर गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** : पेण तालुक्यातील गागोदेवाडी येथे अल्पवयीन मुलीचा विवाह लावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून या प्रकारात मुलीचे आई-वडील, सासू-सासरे आणि पती यांच्यावर गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पीडित मुलगी विवाहाच्या वेळी केवळ 16 वर्षे 6 महिन्यांची असल्याचे तपासात स्पष्ट झाले. 24 डिसेंबर 2024 रोजी समाज रीतीने झालेले हे लग्न सर्व नातेवाईकांना तिचे अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही पार पडल्याचे निष्पन्न झाले. विवाहानंतर पीडित मुलगी गरोदर राहिली आणि तिने एका मुलास जन्म दिला. ती कायदेशीरदृष्ट्या अल्पवयीन असल्यामुळे पतीशी वैवाहिक संबंध ठेवणे हे गंभीर लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यात मोडते, असे तपासात उघड झाले. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुरनं. 250/2025 नोंदवून भारतीय न्यायसंहिता 2023 चे कलम 64(2) (आय), 64(2) (एम), 3(5), POCSO कायदा कलम 4, 6, 8 आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा कलम 8, 10 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मनीषा वेंगुर्लेकर करत आहेत. या प्रकरणामुळे पेणसह गागोदेवाडीत खळबळ उडाली असून अशा प्रकारांवर कठोर शिक्षा होणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# कॉर्पोरेट जगतातील लोभ आणि अस्ताचं भीषण वास्तव




सुप्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांनी 1972 मध्ये केलेली उत्कृष्ट नाट्य रचना म्हणजे घाशीराम कोतवाल! नाट्य रसिकांच्याच नव्हे तर कलावंतांच्याही मनात कायमचं घर करून राहिलेलं हे नाटक आजही अजरामर आहे.

राजकीय व्यंग असलेलं हे नाटक ऐतिहासिक कालखंडावर आधारित आहे. पुण्याचे पेशव्यांच्या दरबारातील प्रमुख मंत्री नाना फडणीस आणि पुण्याचा कोतवाल घाशीराम यांच्या जीवनावर आधारित ह्या नाट्यकलाकृतीचा मुख्य विषय सत्ताधारी माणसे आपला उद्देश साध्य करण्यासाठी कशा प्रकारची विचारसरणी निर्माण करतात आणि राजकारणाचा वापर करून गरज संपल्यावर निरुपयोगी होणाऱ्या व्यक्तींचा कसा बंदोबस्त कसा करतात यावर प्रकाश टाकणारा आहे.

याच नाट्यकलाकृतीशी समांतर कथानक असणारा नाट्यकलाविष्कार लेखक दिग्दर्शक रितेश बायस यांनी 'कॉर्पोरेट घाशीराम' या नावाने 64 व्या राज्य मराठी नाट्य स्पर्धेत सादर केला.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न होत असलेल्या या नाट्य स्पर्धेत सादर होणाऱ्या या नाटकाविषयी खरंतर त्याच्या नावातील 'घाशीराम' या संकल्पनेमुळे अनेकांना त्याचं मोठं कुतूहल होतं. त्याप्रमाणे शुक्रवार दिनांक 21 रोजी या नाटकाचा प्रयोग सादर झाला त्यास रसिकांनी उत्तम प्रतिसादही दिला. नॅशनल आर्ट थिएटर युथ अकॅडमी यांची ही कलाकृती आज कॉर्पोरेट सेक्टर मधील कंपन्यांमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या निष्ठावंत कर्मचाऱ्यांची आधुनिक तंत्रज्ञान आणि एआयद्वारे रिप्लेसमेंट करून त्यांचा "करेक्ट कार्यक्रम" कसा केला जात आहे; यावर अधारित आहे. मुळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रोबोट तंत्रज्ञान माणूस आणि त्याच्या अनुभवांची जागा कधीही घेऊ शकणार नाहीत; हे माहीत असूनही आत्ताच्या कॉर्पोरेट जगतात एआय आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक कामगारांना कॉर्पोरेट राजकारण करून कशा पद्धतीनं देशोधडीला लावलं जात आहे, हा या नाटकाचा मुख्य विषय !

कॉर्पोरेटच नव्हे तर सर्व क्षेत्रात नोकरी करणाऱ्या आजच्या नोकरदार तरुण पिढीला नक्कीच आकर्षित करणारा हा विषय लेखक दिग्दर्शक रितेश बायस यांनी कॉर्पोरेट तरुणाईला केंद्रस्थानी धरून नाट्यरूपात आणला आहे. आजच्या तरुण पिढीला रॅपचं भारी वेड आहे हे ओळखूनच की काय; कॉर्पोरेट घाशीराम सारख्या प्रायोगिक नाटकात रॅपसाँग चा प्रयोग करण्यात आला आहे. मराठी नाटकात रॅपचा प्रयोग अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना यानिमित्त मिळेल.

कॉर्पोरेट जगताला वैतागलेला कामगार इच्छा असूनही राजीनामाही देऊ शकत नाही, अशा पद्धतीने त्याला ब्लॅकमेल केलं जातं. ज्यांचा राजीनामा घेतला जातो, त्यांनाही नैतिक आणि अनैतिक आमिषे दाखवून त्यांचं कशाप्रकारे ब्रेनवॉश केलं जातं आणि त्यांना पुन्हा कॉर्पोरेटच्या दावणीला कसं बांधलं जातं; हे लेखकांनं अतिशय साध्या आणि सोप्या प्रसंगातून सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.



आज नोकरी मिळवण्यासाठी अनेकांचा अत्यंत दयनीय स्ट्रगल सुरू आहे. कॉर्पोरेट जगतात नोकरी मिळवण्यासाठी कोणत्या प्रकारचं चारित्र्य असावं, आणि नसावं हे दाखवण्याचाही प्रयत्न या नाटकातून झालाय. अर्थात हा चिंतनाचा विषय असला तरी हे नाटक पाहिल्याशिवाय कोणातेही तर्क लावता येणार नाहीत, त्यामुळे कॉर्पोरेट विश्वाचं काळं स्वरूप जवळून अनुभवण्यासाठी नाट्य रसिकांनी हे नाटक जरूर पहावं.

नाटकाची सुरुवात घाशीराम कोतवाल या नाटकाच्या नांदीप्रमाणेच आणि त्याच नाटकाची धाटणी आत्मीभूत करून होते. घाशीराम कोतवाल या नाटकाशी समांतर आणि आव्हानात्मक बेअरिंग दिग्दर्शक आणि कलाकारांनी शेवटपर्यंत सांभाळलंय.



घाशीराम कोतवाल या नाटकातील घाशीरामाच्या मुलीचा नाना फडणीस कशा पद्धतीने वापर करून घेतात आणि घाशीरामांना कशा पद्धतीने संपवलं जातं हे आपण पाहिलंय. अगदी त्याच प्रमाणे या नाटकातील कॉर्पोरेट विश्वातले "बॉस" नावाचे नाना फडणवीस कर्मचाऱ्यांच्या महत्वकांक्षांचा कशा पद्धतीने बळी घेतात? हे पटवून दिले आहे.

अपमान आणि उदय असा ढाचा असलेले हे नाटक 'वर्चस्व होल्डिंग्स' या बलाढ्य कंपनीला मिळालेल्या ९० दिवसांच्या 'अल्टिमेटम' ने सुरु होते. तोट्यात असलेल्या विभागांना बंद करण्याची धमकी मिळते. या गोंधळात, HODs आपली भीती लपवण्यासाठी केशव सामंत या सामान्य 'पीआर' कर्मचाऱ्याला बळीचा बकरा बनवतात. त्याला संडास साफ करायला लावून त्याचा अमानुष अपमान केला जातो. पण हाच घाशिराम अचानक ऑफिसचा बॉस कसा बनतो आणि आपल्या अपमानाचा प्रतिशोध घेण्यासाठी तो कोणत्या पातळीवर उतरतो? अशा अनेक प्रश्नांचा कुतूहल या नाटकाच्या पडद्यामागे दडलं आहे. मुख्य म्हणजे नाटकातील नायक घाशीराम कंपनीचा सीसीओ झाल्यानंतर एका महिला कर्मचाऱ्याला अशी अट घालतो की ज्यामुळे संपूर्ण प्रेक्षागृहात भयान शांतता पसरते! ही अटच या कॉर्पोरेट विश्वाचं काळं स्वरूप दाखवायला पुरेशी आहे.

: लेखक - दिग्दर्शक :
**रितेश बायस**
------------------------
**पात्र परिचय :**
**मंदार सावंत - अकाउंट**
**रुपेश बने - सेल्स**
**महेश मोहिते - नानी भाई**
**भक्ती रेमजे - एचआर**
**स्मिता माने - आयटी हेड**
**श्रद्धानंद नारकर - मालक**
**अथर्व भोकसे - संशोधन**
**गायत्री खंडागळे - पीआर**
**अनिकेत देशमुख - घाशीराम**
**दीप्तेश - वेटर**
------------------------
- **संगीत - यश राणे**
- **रैप सोंग - अथर्व भोकसे**
- **मेकअप - गायत्री**
- **वेशभूषा - विनया खाडे**

या नाटकात विनोदी प्रसंग तसे फार कमी आहेत, नाटकात संपूर्ण फोकस कंपनीचा नफा, तोटा, फायदा, टारगेट, सेल्स, प्रोडक्शन, लीगल अॅडव्हाइस, प्रोमोशन, रिजेक्शन आयटी, आर.एन.डी. अशा विषयांवर आणि ऑफिसमध्ये चाललेल्या चढाओढीच्या घाणेरड्या राजकारणावर आहे.

**कॉर्पोरेट जनावरे**

कॉर्पोरेट जनावरे आपण फक्त ऐकलेली आहेत परंतु ही कॉर्पोरेट जनावरे कशी बनवली जातात त्यांना कसं वागवलं जातं आणि त्यांचा कसा वापर करून घेतला जातो हे विनोदी पद्धतीने या नाटकात दाखवण्यात आलं आहे. दोन एक अपवाद वगळता नाटकात विनोदी प्रसंगांचा फारसा समावेश नसला तरी ते गंभीर करणारे आहे.

कॉर्पोरेट सेक्टर मध्ये काम करताना अनेक घाशीरामांचा बळी पडतो, कुठल्या घाशीरामाला प्रमोशन द्यावं कुठल्या घाशीरामाचं ट्रान्सफर करावं कोणत्या घाशीरामाला टर्मिनेट करावे हे कॉर्पोरेट क्षेत्रातले नाना फडणीस यांच्या रुपातले बॉस अगदी बरोबर ओळखतात आणि तसा त्यांचा वापरही करून घेतात असंच काहीसं सांगण्याचा प्रयत्न नाटकातून झालाय, त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या आधुनिक घाशीरामांना हे नाटक आकृष्ट करेल अशा अपेक्षा आहेत

## भविष्यवेध



**सोमवार**
**24 नोव्हेंबर 2025**

**मेष**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृषभ**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**मिथुन**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**कर्क**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**सिंह**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

**कन्या**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**तुळ**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मकर**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू

**मिन**
शकतो. घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# अखेर अमित ठाकरे यांनी नोटीस स्वीकारली

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**
**बातमीदार**

**दरम्यान, अमित ठाकरे 16 नोव्हेंबरला रोजी नवी मुंबई दौऱ्यावर असताना शाखेच्या उद्घटनासाठी आले होते. यावेळी नेरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण गेल्या अनेक महिन्यांपासून झालेलं नाही. महाराजांची मूर्ती कापडाने झाकून ठेवल्याचे दिसून येताच अमित ठाकरे यांनी पुतळयाचे अनावरण केलं होतं. यावेळी पोलीस आणि मनसैनिकांमध्ये काही काळ झडपही झाली. या कृत्यासाठी माझ्यावर कारवाई होते असेल तर ही माझ्या आयुष्यातील पहिली केस होणार आहे. मात्र वेळ आली तर महाराजांसाठी अशा अनेक केसेस अंगावर घेवू, असा पवित्र अमित ठाकरेंनी घेतला होता.**

मनसे नेते अमित ठाकरे यांनी नवी मुंबईमधील शिवाजी महाराजांच्या पुतळयाचं अनधिकृतपणे उद्घाटन केल्यानंतर त्यांच्यावर नेरुळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. गुन्हा नोंद झाल्यानंतर नेरुळ पोलीस त्यांना नोटीस देण्यासाठी शिवतीर्थवर पोहोचले होते. मात्र तुम्ही इकडे येण्याचा त्रास कशासाठी घेतला? मीच तिकडे येऊन नोटीस स्वीकारतो असे म्हणत अमित ठाकरे यांनी नोटीस स्वीकारली नव्हती. आज (23 नोव्हेंबर) त्यांनी नेरूळमध्ये जात विराट शक्तीप्रदर्शन करत पहिल्या केसचे एक प्रकारे जोरदार सेलिब्रेशन केलं. अमित ठाकरे यांचं नवी मुंबईमध्ये आगमन झाल्यानंतर मनसैनिकांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. शिवरायांच्या मूर्तीला अभिवादन केल्यानंतर अमित ठाकरे यांनी चालतच नेरूळ पोलीस स्टेशन गाठलं. नेरूळ पोलीस स्टेशनमध्ये पायी गेल्यानंतर अमित यांनी नोटीस स्वीकारली.

### ■ जगाला आपले गडकिल्ले समजले पाहिजेत

यानंतर अमित ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. ते म्हणाले की मी शुक्रवारी या ठिकाणी येणार होतो. मात्र पोलिसांनी रविवारी येण्याची विनंती केली. शिवरायांचा पुतळ्या उद्घाटन केल्याने आपल्यावर पहिली केस पडली हे भाग्याचं असल्याचं अमित ठाकरे म्हणाले. ते म्हणाले की गडांचे संवर्धन करणे हे माझं स्वप्न आहे. जगाला आपले गडकिल्ले समजले पाहिजेत असे ते म्हणाले. गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी मोहीम हाती घेणार असल्याचेही अमित ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

अमित ठाकरे पुढे म्हणाले की, भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या राजकारणामध्ये पुतळ्याचे अनावरण गेल्या काही महिन्यापासून रखडलं होतं. सेनेनं मला पाठिंबा दिला, मग चार महिने झोपले होते का? अशी विचारणा त्यांनी केली. राज ठाकरे आणि मनसे कार्यकर्त्यांनी मला प्रोत्साहन दिल्याने मी हे काम केल्याचं अमित ठाकरे म्हणाले. आपल्याकडे जात, धर्म, हिंदू, मुस्लिम आणि लाडकी बहीण चालते. मात्र, पर्यावरण आणि इतर विषयाला महत्त्व नसल्याचे अमित ठाकरे म्हणाले. भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये सर्व स्वच्छ होतात. दारू, जमीन घोटाळ्याच्या केसेस मी घेतल्या नसल्याचा टोला सुद्धा त्यांनी लगावला.

# 68 कोटींचा खड्डे दुरुस्ती कार्यादेश ?

## तरीही वसई-विरार खड्डेमयच; सत्ताधारी भाजपकडून कारवाईची मागणी !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**विरार : वसई-विरार महापालिका क्षेत्रातील रस्त्याची दुरुस्ती व खड्डे भरण्यासाठी ६८ कोटी रुपयांच्या कंत्राटाचा कार्यदिश दिल्यानंतरही वसई-विरारमधील रस्त्यांची दुरुस्ती सुरू झालेली नाही. परिणामी पावसाळा संपल्यानंतर शहरातील लाखो नागरिकांना खड्यातूनच प्रवास करावा लागत आहे. याकडे लक्ष वेधत सत्ताधारी भाजपाचे वसई जिल्हा महामंत्री मनोज बारोट यांनी नागरिकांच्या त्रासाबद्दल अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सत्ताधारयांच्या ह्या मागणीमुळे वसई मध्ये खळबळ उडाली आहे.**

आता पर्यन्त विरोधक शहरात पडलेल्या खड्डया बाबत आरोप करत होते. परंतु आता मात्र सत्ताधारीही शहरात पडलेल्या खड्डया बाबत बोलू लागले आहेत. एका बाजूला वसईच्या आमदार खड्डयात भूमिपूजन करत असताना दुसऱ्या बाजूला दुसऱ्या आमदारांचे उजवे हात समजले जाणारे मनोज बारोट मात्र खड्डे बुजविले जात आल्यावर टीका करत असल्याने भाजप मध्य अंतर्गत वाद रंगल्याचे बोलले जात आहे. शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. मात्र, सातत्याने सुरू असलेल्या पावसाने उघडीप न दिल्यामुळे रस्तादुरुस्ती व खड्डे भरण्याची कामे करता येत नव्हती.

आता पर्यन्त विरोधक शहरात पडलेल्या खड्डया बाबत आरोप करत होते. परंतु आता मात्र सत्ताधारीही शहरात पडलेल्या खड्डया बाबत बोलू लागले आहेत. एका बाजूला वसईच्या आमदार खड्डयात भूमिपूजन करत असताना दुसऱ्या बाजूला दुसऱ्या आमदारांचे उजवे हात समजले जाणारे मनोज बारोट मात्र खड्डे बुजविले जात आल्यावर टीका करत असल्याने भाजप मध्य अंतर्गत वाद रंगल्याचे बोलले जात आहे. शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. मात्र, सातत्याने सुरू असलेल्या पावसाने उघडीप न दिल्यामुळे रस्तादुरुस्ती व खड्डे भरण्याची कामे करता येत नव्हती.

# स्कूल व्हॅन मधून विद्यार्थ्यांचा धोकादायक प्रवास

## ११ महिन्यांत १,२९४ वाहनांवर कारवाई ● पालकांच्या निष्काळजीवरही प्रश्नचिन्ह!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने स्पष्ट नियमावली आखून दिली असतानाही, ठाणे शहरात आजही अनेक स्कूल व्हॅनमधून नियम पायदळी तुडवत धोकादायक प्रवास सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. वाहतूक पोलिसांनी वारंवार कारवाई करूनही अनेक खासगी स्कूल व्हॅनचालकांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, लहान मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. ठाणे वाहतूक शाखेकडून १ जानेवारी ते २० नोव्हेंबर या कालावधीत शहरातील विविध भागांत विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १,२९४ स्कूल व्हॅनवर कारवाई करण्यात आली असून यामधून १४ लाख १५ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या संख्येने कारवाई होऊनही परिस्थितीत




अपेक्षित सुधारणा न झाल्याने प्रशासनापुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. नियमानुसार एकाच स्कूल व्हॅनमध्ये सात विद्यार्थ्यांपेक्षा अधिक मुलांना बसवण्यास मनाई आहे. तसेच वाहनांमध्ये प्रथमोपचार पेटी, जीपीएस यंत्रणा, अग्निशमन उपकरण, सुरक्षित आसनव्यवस्था, अधिकृत प्रशिक्षित चालक व वाहक आणि वाहनाचे वैध फिटनेस प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे; मात्र प्रत्यक्ष तपासणीत अनेक वाहनांमधून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना अक्षरशः कोंबून नेण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. बऱ्याच वाहनांमध्ये अग्निशमन यंत्र, प्राथमिक उपचार साहित्य किंवा आपत्कालीन सुविधा नसल्याचेही आढळून आले. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी पालकांनाही जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. फक्त सोयीसाठी नियमांकडे दुर्लक्ष करून मुलांना धोकादायक वाहनांत पाठवणे चुकीचे आहे. पालकांनी सुरक्षिततेला प्राधान्य देऊन नियमबाह्य स्कूल व्हॅनचा वापर टाळावा, असे आवाहन पोलिस अधिकाऱ्यांनी केले आहे. शहरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, यापुढे आणखी कठोर तपासणी मोहिमा राबवल्या जाणार असल्याचा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

# 'आपला दवाखाना' उपक्रमातील कंत्राटी कर्मचा-यांचा थकीत पगार खात्यावर जमा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. २३ :** ठाणे महापालिकेने ४० ठिकाणी सुरू केलेल्या 'आपला दवाखाना' उपक्रमातील कंत्राटी कर्मचारी आणि परिचारिकांचा तीन महिन्यांपासून थकीत असलेला पगार अखेर त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. आमदार संजय केळकर यांनी केलेली आक्रमक मागणी आणि पाठपुराव्यामुळे हे यश मिळाले आहे. कंत्राटदार कंपनीने ऑक्टोबरपर्यंत मुदत असताना ऑगस्टमध्येच दवाखाने बंद केल्याने कर्मचारी बेरोजगार झाले होते आणि त्यांचा पगारही रखडला होता. कर्मचाऱ्यांनी आमदार केळकर यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली होती. केळकर यांनी पालिका प्रशासनाला धारेवर धरत संबंधित कंपनीला दंड लावून कर्मचाऱ्यांचे वेतन त्वरित अदा करण्याची मागणी केली होती. तसेच कारवाई न झाल्यास मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. यावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली. अखेर रखडलेले तीन महिन्यांचे वेतन कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याने आनंदाचे वातावरण आहे.

# पडघा बस स्थानकाजवळील एकमेव प्रसाधनगृहाची दुरावस्था





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि. २३ (प्रतिनिधी)**

वाढत्या लोकसंख्येमुळे चर्चेत आलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्थानक परिसरात असलेल्या सार्वजनिक प्रसादनगृहाची (मुतारी) दुरावस्था झाली असुन अस्वच्छता व दुर्गंधीमुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

परिसरातील शेकडो खेडी, पाडी, गांवाचें विविध स्तरांवर केंद्रबिंदु असलेल्या पडघा येथे दररोज हजारो नागरीक विविध कामांसाठी येत असतात तसेच पडघा बस स्थानकावरून शेकडो नागरीक विविध ठीकाणी प्रवास करीत असतात. त्याच्यांसाठी व पडघा नागरीकांसाठी एकमेव असलेल्या पुरुष प्रसाधनगृहाची (मुतारी) दिवसेंदिवस वाईट अवस्था होत चालली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे परिसरात नागरिकांची संख्या वाढली असुन अत्यावश्यक सुविधांकडे ग्रामपंचायतीचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे.

पडघा बाजारपेठेतील हे एकमेव सार्वजनिक प्रसाधनगृह असल्याने दररोज शेकडो प्रवासी, स्थानिक रहिवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि दुकानदार त्याचा वापर करतात मात्र मुतारीची मोडकळीस आलेली अवस्था, अरुंद रस्ता, दरवाजे नसणे, चारही बाजूंना पसरलेला कचरा, प्रसाधनगृहातील पाण्याचा निचरा होत नसल्याने अस्वच्छता आणि सतत जाणवणारी तीव्र दुर्गंधी यामुळे नागरिक त्रस्त आहेत.अनेक नांगरीकानी पडघा ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करुनही परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही. अस्वच्छतेमुळे प्रसाधनगृहात शिरायलाही धाडस होत नाही, प्रवासी तर आत जातानाच माघारी फिरतात अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून मिळत आहे.

तसेच अस्वच्छतेमुळे परिसरात रोगराई पसरण्याचीही भीती नागरिक व्यक्त करत आहेत.पडघ्या सारख्या महत्त्वाच्या व्यापारी व वाहतूक केंद्र, दीवसभर वर्दळ असलेल्या शहराच्या प्रसादनगृहाची दुरावस्था असणे ही गंभीर बाब असल्याने ग्रामपंचायतीकडून प्रसाधनगृहाची तात्काळ दुरूस्ती, स्वच्छता व्हावी अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# डिजिटल अटक रोखण्यासाठी प्रत्येक पोलिस परिमंडळात जागरुकता मोहिम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** देशभरात 'आभासी अटके'च्या (डिजिटल अटक) नावाखाली मोठ्या प्रमाणात फसवणूक नोंदली जात आहे. जानेवारी ते ऑक्टोबर अखेरपर्यंत मुंबईत १४२ गुन्हे नोंदले गेले असून त्याद्वारे ११४ कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्यातही असे गुन्हे घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी प्रत्येक परिमंडळात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये जागरुकता मोहिम सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

'आभासी अटक' अशी पद्धत देशातच काय तर जगभरात उपलब्ध नाही. कुठल्याही कायद्यात अशी तरतूद नाही. त्यामुळे अनोळखी व्हिडिओ कॉल न उचलणे वा अजाणतेपणे असे कॉल उचलले तरी पैशाची मागणी पूर्ण न करणे याद्वारे कथित 'आभासी अटक' पद्धतीला बळी पडणार नाही, अशा आशयाची जागृती सायबर गुन्हे विभागाचे पथक प्रत्यक्ष घरी जाऊन करीत आहे. मुंबईत पाच प्रादेशिक विभाग असून प्रत्यक विभागात सायबर गुन्ह्याच्या वाढत्या आव्हानाला तोंड देण्यासाठी प्रशिक्षित अधिकाऱ्यांचा स्वतंत्र विभागा कार्यान्वित करण्यात आला आहे. आभासी अटकेच्या पद्धतीला प्रामुख्याने वयोवृद्ध, महिला, तरुण बळी पडत आहेत. काही प्रकरणात उच्चशिक्षितही फसत आहेत. त्यामुळे केवळ जनजागृती करणे हाच पर्याय असल्याचे लक्षात घेऊन पोलिसांनी घरोघरी जाऊन मोहिम राबविण्याचे ठरविले आहे.

अलीकडे सायबर पोलीस पथकाने परिमंडळ एकमधील ६२६ ज्येष्ठ नागरिकांचे घरी जाऊन प्रबोधन केले. आभासी अटक हा प्रकारच अस्तित्त्वात नाहीत, असे बिंबविण्यात आले. या फसवणुकीपासून रोखण्यासाठी कुठली काळजी घेतली जावी, याची माहिती पुस्तिक देण्यात आली. असा प्रकार घडलाच तर प्रसंगी १९३० किंवा नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात आला. याशिवाय विविध प्रकारचे सायबर गुन्हे घडत असून या प्रकरणी मुंबई पोलिसांनी मे २०२२ मध्ये हेल्पलाईन सुरु केली होती. आतापर्यंत एक लाखाहून अधिक तक्रारी या हेल्पलाईनवर नोंदल्या गेल्या आहेत.

# राज्यस्तरीय कला स्पर्धेत पालघर जिल्ह्याची अव्वल कामगिरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**विक्रमगड, ता. २३ (बातमीदार):** नागपूर येथे प्रगती प्रतिष्ठान आणि भगवान बिरसा कला संघम यांच्या संयुक्त विद्यमान घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कला स्पर्धेला उत्साहात प्रतिसाद मिळाला. नृत्य, वाद्य, फोटोग्राफी, पेंटिंग, ब्लॉग, रील अशा विविध प्रकारांमध्ये राज्यभरातून स्पर्धकांनी आपली कला सादर केली. या स्पर्धेत पालघर जिल्ह्यातील अनेक कलाकारांनी उल्लेखनीय यश मिळवत जिल्ह्याचा आणि आदिवासी समाजाचा मान उंचावला आहे. रील निर्मितीमध्ये मयूर तुंबडा, नृत्य स्पर्धेमध्ये रवि सातपुते यांचा प्रथम क्रमांक, तर चित्रकला स्पर्धेत डहाणूतील संदीप भोईर याचा द्वितीय, तर फोटोग्राफीमध्ये अमित भवारी याचा तृतीय क्रमांक आला आहे. वाद्य वादन स्पर्धेतील विक्रमगड नंदू बरतडे आणि नंदू कवटे यांचा अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक आला. गायनामध्ये सीता गावंधा हिचा तृतीय, ब्लॉग व्हिडिओसाठी अमृता डोके हिचा द्वितीय, तर नयन कांबडी हिचा तृतीय क्रमांक आला आहे.

# हेरीटेज वॉकच्या माध्यमातून कल्याणचा ऐतिहासिक वारसा जपण्याचा संकल्प

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याणचा ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संकल्प करत कल्याणमधील सर्व रोटरी क्लबने संयुक्तरित्या आयोजित केलेला हेरीटेज वॉक हा भव्य उपक्रम शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. शहरातील तब्बल २० पेक्षा अधिक ऐतिहासिक स्थळांना भेट देत सुमारे ४० इतिहासप्रेमी, अग्रवाल कॉलेजचे विद्यार्थी, नागरिक आणि विविध रोटरी क्लबचे कार्यकर्ते उत्साहात सहभागी झाले. वॉकची सुरुवात १६२ वर्षे जुन्या सार्वजनिक वाचनालय, कल्याण येथे झाली.

विशेष म्हणजे या ऐतिहासिक वाचनालयाला महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार नुकताच प्राप्त झाला असून तो उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि विधान परिषद सभापती निलम गोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. ज्ञान, संशोधन आणि वाचनसंस्कृतीचा समृद्ध वारसा जपणारे हे वाचनालय कल्याणच्या सांस्कृतिक इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते.

या हेरीटेज वॉकचे उद्घाटन रोटरीचे जिल्हा प्रांतपाल हर्ष मकोल यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनी आपल्या भाषणात या उपक्रमाचे विद्यार्थ्यांमध्ये आणि पुढील पिढ्यांमध्ये वारसा जतनाची



जाणीव निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आयोजन करण्याची गरज व्यक्त केली. माजी जिल्हा प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी यांनीही उपस्थित राहून हा प्रकल्प आणखी मोठ्या स्वरूपात पुढे राबवण्याचा संकल्प व्यक्त केला.

या भव्य उपक्रमाचे नेतृत्व रोटरी क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा रुईता सपकाळे यांनी केले. त्यांच्यासह रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईडचे अध्यक्ष महेश टिबे, रोटरी क्लब ऑफ सेंट्रल कल्याणचे अध्यक्ष रवी कुऱ्हाडे, रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंडचे अध्यक्ष डॉ. संदीप वनसूत्रे, रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्सचे अध्यक्ष भूषण कोठवडे, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटीचे अध्यक्ष निखिल परमार तसेच रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष धीरेंद्रप्रताप सिंग हेही उपस्थित होते. सर्व क्लबच्या संयुक्त उपस्थितीमुळे हेरीटेज वॉकला विशेष उर्जा आणि भक्कम पाठबळ मिळाले. या वॉकदरम्यान इतिहासप्रेमींनी आणि विद्यार्थ्यांनी कुंभारवाडा, सुभेदार वाडा, शाही बावडी, दुर्गाडी किल्ला, त्रिविक्रम मंदिर, फाळके वाडा, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे आजोळ, पारशी मंदिर, राम मंदिर आणि आनंदीबाई जोशी यांचे घर अशा अनेक ऐतिहासिक वास्तूंना भेट देत कल्याणच्या समृद्ध भूतकाळाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. वॉकनंतर रोटरी क्लबने शहरातील प्रत्येक ऐतिहासिक स्थळी माहिती फलक बसवण्याचा आणि हेरीटेज वॉक वर्षभर सातत्याने राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. सुमारे ४० इतिहासप्रेमी नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग हा या उपक्रमाच्या यशाचा पुरावा ठरला असून कल्याणचा वारसा जतन करण्यासाठी रोटरीचे हे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद ठरले आहेत.

# ओम साई मंडळाच्यावतीने पेण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण ( प्रतिनिधी )** पेण तालुक्यातील श्री साईबाबांची मानाची पालखी मिरवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण तर्फे यावर्षीही पेण ते शिर्डी अशी पायी पदयात्रा पेण मधून निघाली आहे.

सुरूवातीला भव्यदिव्य मिरवणुकीचे पेण शहरात आयोजन करण्यात आले होते. शहरातील साई मंदिर कासार तलाव येथून निघालेली मिरवणूक विद्युत रोषणाई, ब्रॉसबँड पथकाच्या सुंदर संगीताच्या तालावर चलचित्र रथ यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश होता.

पेण साई मंदिरा पासून सुरू झालेली ही मिरवणूक तेराघरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, महावीर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळीमार्गे पुन्हा साई मंदिरात परतली. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले होते. घरासमोर मिरवणूक आल्यानंतर प्रत्येक महिला भगिनींनी आरती ओवाळून औक्षण केले. शेवटी साई बाबांच्या मंदिरात महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता झाली.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी साईमंदिरात आरती करून साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ झाली. गेली 17 वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. सदर मिरवणूक पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे शेकडो सहकारी हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतात.

शिर्डीला निघालेल्या या पालखी पदयात्रेत पेण शहरासह तालुक्यातील अनेक तरुण सामील झाले आहेत. सदर पालखी २८ नोव्हेंबर रोजी शिर्डीला पोहोचणार आहे. त्यानंतर साईबाबांचे दर्शन करून पुन्हा सर्व पदयात्री भक्त पेणच्या दिशेने परत येण्यासाठी निघणार असल्याची माहिती कल्पेश ठाकूर यांनी बोलताना दिली.



ठाणे ■ सोमवार
24 नोव्हेंबर 2025
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# अर्णव खैरे आत्महत्या : प्रवासी संघटना आक्रमक - रेल्वेतील टोळक्यांची गुन्हेगारी रोखण्याची मागणी

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**ठाणे:** 'मराठी बोलता येत नाही का, मराठी बोलताना लाज वाटते का' असे प्रश्न विचारत कल्याणमधील अर्णव खैरे या मराठी तरुणाला टोळक्याने मारहाण केली होती. या घटनेनंतर अर्णव याने घरी जाऊन मानसिक तणावातून आत्महत्या केली. अर्णव याच्या मृत्यूनंतर उपनगरीय रेल्वे प्रवासा दरम्यान काही टोळ्या निर्माण झाल्याचा दावा रेल्वे प्रवासी संघटनेने केला आहे. या टोळ्यांवर कारवाईचा बडगा उचला अशी मागणी संघटनेने केली आहे. उपनगरीय रेल्वे प्रवासातील ही मुजोरी, अरेरावी मोडीत काढण्यासाठी किमान एक रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वे पोलीस यांचे पथक तयार करुन किमान टिटवाळा, कल्याण, डोंबिवली ठाणे या रेल्वे स्थानकात गर्दीच्या वेळेत पोलीस तैनात करून दरवाजे अडवून ठेवणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उचलायला हवा आणि या स्थानकातील प्रत्येक फलाटावर या टोळक्यांची गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी तक्रारी नोंदणी सुरु व्हावी अशाही मागण्यांच्या यामध्ये सामावेश आहे. कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे सरचिटणीस आणि डिआरयुसीसी मेम्बर मध्य रेल्वे श्याम उबाळे यांनी केला असून अर्णव खैरे या प्रकरणात कसून चौकशी करून यातील दोषींवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रेल्वे लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बल आयुक्त यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## गोवठणे प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** स्वर्गीय तुषार विनोद म्हात्रे याच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त रा.जि.प.प्राथमिक शाळा गोवठणे येथे विद्यार्थ्यांना खाऊ आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

मनुष्याचे खरे सुख त्याच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यात नसून इतरांना मदत करण्यात आहे.समाजऋण फेडण्याची जाणीव असणे हे माणूसपणाचे लक्षण आहे.याच जाणिवेतून चिरंजीव स्वर्गीय तुषार विनोद म्हात्रे याच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने रा. जि. प. प्राथमिक शाळा गोवठणे उरण येथील शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विनोद म्हात्रे, संध्या म्हात्रे,संतोष म्हात्रे, सुगिंद्र म्हात्रे, किशोर म्हात्रे, जागृती म्हात्रे,संकेत, चिन्मय ,श्रीया म्हात्रे , वि.स.म्हात्रे,कोल्हे सर,राजेंद्र पाटील, तृप्ती वर्तक, पूजा वर्तक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष म्हात्रे यांनी केले.आभार प्रदर्शन कोल्हे सर यांनी केले.

## सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, दि.23:**क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा 2025-26 चे आयोजन दि.21 ते 23 नोव्हेंबर 2025 या कालावधीत सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन दि.22 नोव्हेंबर 2025 रोजी उपायुक्त, क्रीडा उल्हासनगर महानगरपालिका श्रीम. स्नेहा कर्पे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष आव्हाड , आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू श्री.सचिन म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे कार्यकारी प्रमुख श्रीकांत गोरे, सेंच्युरी रेयॉन चे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. मिलिंद भांडारकर, बी.के.बिर्ला महाविद्यालय तसेच शाळा व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक तसेच संचालक कुलगुरू डॉ.नरेशचंद्र, सेंचुरी रेऑन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना बदाने, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के,पर्यवेक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ विभागांमधून मुलामुलींचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते. या संघांमधून मुलींच्या गटात लातूर विभागाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून नागपूर तसेच छत्रपती संभाजी नगर यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले. तर 14 वर्षाखालील मुले या गटात प्रथम क्रमांक कोल्हापूर या विभागास प्राप्त झाला असून लातूर व मुंबई या विभागांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमधून स्पर्धेत सहभागी सर्वच आठही विभागातील खेळाडूंना उत्तम प्रतीचे ट्रॅक सूट देण्यात आले. तसेच स्पर्धेतील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह, मेडल आणि प्रत्येक विजयी खेळाडूला "स्मार्ट वॉच" देण्यात आले. ही स्पर्धा अत्यंत उत्साहाने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या स्पर्धेकरिता जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ तसेच सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.



## वाहुली : सात फुटी अजगराला पकडण्यात सर्पमित्रांना यश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि.२३ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या पडघ्याजवळील वाहुली येथे सात फुट अजगराला सुरक्षित पकडण्यात पडघा येथील सर्पमित्रांना यश आले आहे.

वाहुली गावातील रस्त्यावर बिनविषारी सात फुट लांब एक भला मोठा अजगर फिरत असल्याचे ग्रामस्थांना दिसले त्यानुसार त्याची खबर पडघा व परिसरातील सर्पमित्र रवी दांडगे, मयूर बजागे, सुरज गायसमुद्रे, आकाश जाधव, संस्कृती रवि दांडगे, सुहास दोंदे यांना दिली. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी वाहुली येथे जाऊन मोठ्या शिताफीने सावधगिरी बाळगून अजगराला सुरक्षित पकडुन जिवदान दिले. सर्पमित्रांनी पकडलेल्या अजगराल वडपा येथील वनअधिकारी मोनीका बेलदार, मिरकुठे यांच्या उपस्थितीत नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले. थंडीचा मोसम सुरू असुन विषारी बिनविषारी साप उब व भक्ष शोधण्यासाठी मानवी वस्तीत शिरतात साप दिसताच नागरीकांनी कुठल्याही प्रकारचा धोका न पत्करता सर्पमित्रांना पाचारण करावे असे आवाहन सर्पमित्र मयूर बजागे, रवी दांडगे यांनी केले आहे.




# भाजपाची आश्वासन पूर्ती
## अनमोल नगरी ते साईनगर परिसरात नवी जलवाहिनी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

डोंबिवली पश्चिम येथील महात्मा फुले रोड वरील अनमोल नगरी ते साईनगर या परिसरात १५० मिमी व्यासाची पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे आश्वासन भाजपाच्या वतीने देण्यात आले होते. या आश्वासनाची पूर्तता झाली. यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. येत्या काळातही भाजपाच्या वतीने अशाच प्रकारे जलदगतीने विकासकामे करण्यात येतील. परंतु त्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे, असे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यावेळी केले.

याप्रसंगी भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष प्रियाताई जोशी, भाजपा डोंबिवली पूर्व मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, नंदू म्हात्रे, जितू भोईर, प्रकाश भोईर, हृदयनाथ भोईर, विजय भोईर, अनमोल म्हात्रे, सरोजताई भोईर, माणिक म्हात्रे, प्रशांत पाटेकर, जयप्रकाश सावंत, सीताराम कदम, प्रदीप जोशी, श्री. तुपांगे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत अनेक डोंबिवलीकर उपस्थित होते.





# पेण एज्युकेशनच्या प्राथमिक शाळेत नव्या जगाच्या पालकत्वावर कार्यशाळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण/प्रतिनिधी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेत सोबती ट्रस्टने आयोजित केलेल्या "नव्या जगाचे पालकत्व" ही कार्यशाळा पालकांसाठी आपल्या सगळयांसाठी मनाला भिडणारा आणि विचारांना नवी दिशा देणारी होती. मानसोपचार तज्ञ डॉ तुषार पाटील आणि मानसोपचारतज्ञ डॉ नरेश पवार यांनी कृती, नाट्य आणि मनमोकळया संवादातून पालक आणि मुलांच्या भावना अगदी हळुवारपणे उलगडून दाखवल्या. पालकांच्या संवादामुळे मुलांची छोटया छोट्या तक्रारींची कारणे समजली आणि मनातल्या अनेक प्रश्नांची शांत उत्तरंही मिळाली .

या कार्यक्रमासाठी पेण एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष ॲड.मंगेश नेने उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू सदस्या डॉ. नीता कदम, मुख्याध्यापिका सौ. लेखा ठाकूर तसेच पालक सदस्य व पालक उपस्थित होते.

शाळेत शिक्षक पालक व विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित केलेला उपक्रम हा केवल अनुभवासाठी नाही, तर आपल्या मुलांसोबत हातात हात घालून संवेदनशील, समजूतदार आणि प्रेमळ पालक म्हणून पुढे जाण्याची नवी सुरुवात ठरली. आपण सगळेजण मिळून मुलांसाठी सुरक्षित, प्रेमळ आणि समजून घेणारे जग घडवू या अशी भावना निर्माण करून पालकांना मुलांच्या समस्या व त्या समस्या सोडविण्यासाठी आपण आई वडील म्हणून काय केले पाहिजे यासाठी पालकांना बोलते करून त्यांच्या मनातील प्रश्नांना वाचा फोडून अनेक उदाहरणे देऊन शंकांचे निरसन केले. तसेच मुलांमध्ये संवाद घडवून आणणे, मोबाईल पासून मुलांना दूर ठेवणे, खेळण्यासाठी प्रोत्साहित करणे, मनावरचा दडपण कमी करण्यासाठी आई बाबांनी मुलांना आपलेसे करणे व प्रेमाचे संभाषण करून त्यांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन सकारात्मक विचार तयार करून आपला पाल्य यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये बदल करणे काळाची गरज ओळखून पालकांनी मुलांना अभ्यासाची गोडी वाढवावी असे डॉ तुषार पाटील यांनी पालकांना मार्गदर्शन करताना केले.तर डॉ.नरेश पवार यांनी मन शांत ठेवण्यासाठी करावयाची प्रात्यक्षिके सादर करुन पालकांच्या मनात सकारात्मक उर्जा निर्माण करून माहिती दिली.

सोबती ट्रस्ट, सर्व मान्यवर, पालकवर्ग, शिक्षकवर्ग आणि पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.सहशिक्षिका गीता म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले.

# रोटरी क्लब सेवा सप्ताहात नागरिकांना मिळाले मोफत आयुष्यमान कार्ड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे : प्रतिनिधी** गरीब व गरजू नागरिकांच्या आरोग्याच्या खर्चासाठी आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत कॅशलेस आरोग्य सुविधा तसेच वरिष्ठ नागरिकांसाठी वय वंदना कार्ड नोंदणीसाठी विभाग 8 मधील रोटरी क्लब ऑफ ठाणे क्रिकसाईड, रोटरी क्लब ऑफ ठाणे पॅशन, रोटरी क्लब ऑफ ठाणे ॲसेर, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेजेंड, रोटरी क्लब ऑफ ठाणे रॉयल्स, रोटरी क्लब ऑफ ठाणे डाऊनटाऊन, रोटरी क्लब ऑफ ठाणे अरबेनिया, रोटरी क्लब ऑफ ठाणे ईस्ट, रोटरी क्लब ऑफ ठाणे, रोटी क्लब ऑफ ठाणे एंजल्स या एकूण 10 रोटरी क्लबच्या वतीने सेवा सप्ताहाचे अंतर्गत श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे दिनांक 23 नोव्हेंबर 2025 रोजी गरजू नागरिकांसाठी मोफत आयुष्यमान कार्ड व वरिष्ठ नागरिक कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी रोटरी क्लब ऑफ ठाणे क्रिकसाईड अध्यक्ष विभावरी मणी, रोटरी क्लब ऑफ ठाणे पॅशन अध्यक्ष गीतांजली देवखिळे, रोटरी क्लब ऑफ ठाणे ॲसेर अध्यक्ष चांदणी मारवा, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेजेंड अध्यक्षा उषा मनी, रोटरी क्लब ऑफ ठाणे रॉयल्स कार्थिक राधा क्रिश्नन, रोटरी क्लब ऑफ ठाणे डाऊनटाऊन अध्यक्ष सुनील जोशी, रोटरी क्लब ऑफ ठाणे अरबेनिया डॉ.दीपक केवले, रोटरी क्लब ऑफ ठाणे ईस्ट अध्यक्ष केथियन कवन, रोटरी क्लब ऑफ ठाणे गिरीज वर्तक, रोटी क्लब ऑफ ठाणे एंजल्स गिरीज पोद्दार, श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील नागरिकांनी या शिबिरात मोठ्या उत्साहात सहभागी होऊन फायदा घेतला.

## जिल्हा परिषद , पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर
# पोलिसांचे कोसले ग्रामस्थांना मार्गदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकी संदर्भात कल्याण तालुक्यातील खडवली गट व बेहरे गणामध्ये कोसले गावामध्ये निवडणूकीच्या अनुषंगाने पोलीस पाटील विलास पाटील, सरपंच दिलीप पालवी यांच्या अध्यक्षतेखाली कल्याण ग्रामीणचे टिटवाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पंकज गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सभा पार पडली. या सभेमध्ये गावातील ग्रामस्थांचा व नवतरुण मतदारांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

निवडणूक दरम्यान गावांमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये व कायदा सुव्यवस्था अबाधित राखून कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची प्रत्येक नागरिकांनी व ग्रामस्थांनी काळजी घेतली पाहिजे असे पोलीस निरिक्षक पंकज गिरी यांनी ग्रामस्थांना आव्हान केले. या सभेमध्ये गावातील नव तरुणांबरोबर ग्रामपंचायत सदस्य, सर्व पक्षांचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिक, तंटामुक्त अध्यक्ष ह.भ.प. विलास महाराज पालवी, शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, वयोवृद्ध नागरिक उपस्थित होते.

नवतरुण मतदारांचे पोलीस निरिक्षक पंकज गिरी यांच्या हस्ते कौतुक व जबाबदारी समजावून सांगून त्यांचे अभिनंदन केले. निवडणुकीमध्ये नवतरुणाचा सहभाग पाहता व घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी निवडणुकीपूर्वी प्रत्येक गावामध्ये मार्गदर्शन द्वारे कायदा सुव्यसुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा प्रयत्न आहे.

# मलंगगड - तरूणाकडे सापडले गुंगीचे औषध
## गुंगी आणणाऱ्या विविध कंपन्यांच्या १७४ बाटल्या जप्त केल्या

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण -** कल्याण पूर्वेतील मलंगगड रस्त्यावरील काकडवाल गावातील एका तरूणाकडे हिललाईन पोलिसांनी नशा, गुंगी आणणाऱ्या विविध कंपन्यांच्या १७४ बाटल्या जप्त केल्या आहेत. या औषधांची बाजारातील किंमत ४६ हजार रूपये आहे. पोलिसांनी या तरूणाला औषध साठ्यासह अटक करून त्याच्यावर हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जितेंद्र उर्फ जितू ज्ञानदेव पावशे (३१) असे या तरूणाचे नाव आहे. तो बेरोजगार आहे. हिललाईन पोलीस ठाण्याचे हवालदार संदीप चव्हाण यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मंगळवारी रात्री मलंगगड रस्त्यावरील नेवाळी नाका येथील ओमसाई चाळ भागात हा साठा जप्त करण्यात आला आहे.

# कार्यालयीन वेळेत निवडणूक अधिकारी लग्न सोहळ्यात व्यस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** येत्या काही महिन्यात होणाऱ्या ठाणे महापालिका निवडणुकीसाठी पालिका निवडणुक विभागाने प्रारुप मतदार याद्याही जाहीर केल्या आहेत. मात्र, या याद्यांमध्ये मोठा घोळ असल्याचा आरोप मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन केला.

पालिका अधिकाऱ्यांना सत्ताधाऱ्यांना अपेक्षित याद्या बनविल्या असल्याचा आरोप करत ते पालिका मुख्यालयात अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी गेले. परंतु अधिकारी कार्यालयीन वेळेत लग्न सोहळयाला गेल्याचे समजाच मनसे कार्यकर्ते संतप्त झाले आणि त्यांनी घोषणाबाजी केली.

**ठाणे महापालिकेने मतदार याद्या जाहीर करण्याच्या पंधरा दिवस आधी प्रभागांचे नकाशे जाहीर केले होते. परंतु मंजूर नकाशा आणि त्यामधील मतदार संख्या यात मोठी तफावत आहे. हे एका प्रभागाच्या निरक्षणातून समोर आले असून ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३३ प्रभाग आहेत. नकाशामध्ये दाखवलेल्या सीमारेषेच्या बाहेरील देखील इमारती आणि मतदारांची नोंदणी मतदार यादीत करण्यात आलेली आहे.**

ठाणे महापालिकेची निवडणूक जानेवारी महिन्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या निवडणुकीसाठी पालिकेच्या निवडणूक विभागाने गेल्या काही महिन्यांपासून तयारी सुरू केली आहे. या निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचनेबरोबरच आरक्षण सोडत प्रक्रिया पालिका निवडणुक विभागाने उरकली असून त्यापाठोपाठ प्रारुप मतदार याद्याही जाहीर केल्या आहेत. या याद्यांनुसार, गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदारांच्या संख्येत ४ लाख २१ हजारांनी वाढ झाली असून प्रत्येक प्रभागातील मतदार संख्येत दहा हजाराहून अधिक वाढ झाल्याची माहिती पुढे आली आहे. असे असतानाच या मतदार याद्यांमध्ये मोठा घोळ झाल्याचा आरोप मनसेनचे नेते अविनाश जाधव यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन केला.

# सर्व दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ - आ.संजय केळकर




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या हक्कांच्या प्रश्नांना गती देण्यासाठी आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे यांचे मार्गदर्शनाखाली संजय गांधी निराधार योजना विभागाचे तहसीलदार, भाजपा दिव्यांग विकास आघाडी, ठाणे शहर अध्यक्ष आनंद जयराम बनकर आणि अन्य अधिकारी यांचे उपस्थित दि.21 नोव्हेंबर 2025 रोजी भाजपा कार्यालय, खोपट येथे दिव्यांगांचे समस्या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

बैठकीत संजय गांधी निराधार योजनेचे प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळणार असे आ.संजय केळकर यांनी सांगितले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी विशेष मुलांना (१८ वर्षांवरील मतीमंद) अतिरिक्त सुविधा देण्याबाबतही गंभीर चर्चा झाली. पालकांचा ताण कमी करण्यासाठी आणि मुलांच्या सन्मानपूर्ण जीवनासाठी मनपाने विशेष मुलांचे पालकत्व स्वीकारणे, योग्य आहार व आरोग्य सेवा, नियमित औषधोपचार, मासिक पेन्शन,

सदनिका उपलब्ध करणे, स्वयं रोजगारासाठी स्टॉल/गाळे उपलब्ध करणे, 'आनंद भवन'मध्ये तीन माळे राखीव ठेवणे, हा प्रस्ताव आमदार संजयजी केळकर व आमदार निरंजनजी डावखरे यांच्या समोर सादर करण्यात आला. दोन्ही मान्यवरांनी या विषयाला सकारात्मक प्रतिसाद देत त्वरित पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत ठाणे महानगरपालिका दिव्यांग समिती सदस्य तसेच वकील रंजनजी राजगीर, जयश्री वाघ, मंगल शर्मा सह अनेक दिव्यांग बांधव उपस्थित होते.

दिव्यांगांच्या न्यायासाठी गेले अनेक वर्षे लढत असलेल्या या पुढाकाराला सामाजिक स्तरावर मोठे महत्त्व प्राप्त झाले असून, संजय गांधी योजनेचा लाभ सर्व दिव्यांगांपर्यंत पोहोचण्यास आता गती मिळणार आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024